महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयातील अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांकः अस्थाप-२०१९/प्र.क्र.२९/आस्था-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ मार्च, २०१९.

वाचा- १) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००१/प्र.क्र.२९८/सां.का.१, दिनांक २३.०३.२००६
२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय, क्रमांक:अस्थाप-२०१८/प्र.क्र.२३/आस्था-२, दि.२८.०९.२०१८.
३) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे पत्र क्र. सामंमं-२०१९/४७९, दि.०५.०२.२०१९
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१९/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२१ .०२.२०१९

शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई येथील खालील ४ अस्थायी पदांना संदर्भ क्र. २ येथील दिनांक २८.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. संदर्भ क्र.३ येथील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयातील एकूण ४ अस्थायी पदांच्या आवश्यकतेबाबतचा प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता संदर्भाधीन क्र.४ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारांतर्गत विहित अटींच्या अधीन राहून, पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ४ पदांना **दिनांक १.३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९** पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदसंख्या	वेतनस्तर
१	सहायक लेखा अधिकारी	१	एस-१५
२	निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी), अध्यक्षांचे स्वीय सहायक	१	एस-१४
३	लिपिक-टंकलेखक	१	एस-६
४	वाहन चालक	१	एस-६
	एकूण अस्थायी पदे	**४**	

उपरोक्त बाबीवर होणारा खर्च " मागणी क्रमांक झेडएफ - ०२, २२०५, कला व संस्कृती, ००, १०२, कला व संस्कृती प्रचालन (०१) अनिवार्य (०१) (०१) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (अनिवार्य) (२२०५ ३१७२) ०१ वेतन" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१९०३०७१७१०५६५४३३** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

M. P. Kudtarkar
Digitally signed by M. P. Kudtarkar
Date: 2019.03.12 10:41:53 +05'30'

(मं.प. कुडतरकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
४) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
५) कोषागार अधिकारी, मुंबई.
६) कार्यासन (व्यय-४)/आकृतीबंध पुनरर्चना कक्ष, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.
७) मराठी भाषा विभागाची सर्व कार्यासने.
८) निवडनस्ती.